दैनिक महाराष्ट्राच्या परिवर्तनवादी विचारांचे ऐकमेव निर्भिड दैनिक

# वादळ वार्ता

vadalvartanews@gmail.com संपादक : अजय भांगे https://epaper.vadalvarta.com

बीड (महाराष्ट्र) दैनिक मराठी ● मंगळवार दि.२८ ऑक्टोबर २०२५ ● 9422660077 ● आरएनआय-एमएएचएमएआर/२०२३/८७५५५ ● वर्ष ३ रे ● अंक ६८ ● पाने ४ ● किंमत ४ रुपये

Beed (Mahmar) Daily Marathi ● Tuesday 28 Oct 2025 ● 9422660077 ● RNI-MAHMAR / 2023 / 87555 ● Year - 3rd ● Issue 68 ● Pages 4 ● Rate 4 Rs


## मोहोळ यांचा मंत्रिपदावर राहण्याचा अधिकार नाही

**मुंबई**–विजय वडेट्टीवार रविवारी पत्रकारांशी बोलताना म्हणाले, केंद्रीय मंत्री मुरलीधर मोहोळ यांनी जे काही कारनामे केलेत ते आता उघड होत आहेत. ही तर केवळ सुरुवात आहे. त्यांनी तिकडे जमिनीच्या संदर्भात मोठा धिंगाणा घातला आहे. असा धिंगाणा सगळेच घालत आहेत. सध्या सगळीकडेच महाराष्ट्र लुटण्याचे काम सुरू आहे. वरपासून खालपर्यंत जमिनी लाटण्याचे काम सुरू झाले आहे. पण एक लक्षात घेतले पाहिजे की, मुरलीधर मोहोळ यांनी केंद्रीय राज्यमंत्रिपदाच्या पदावर राहून अशा प्रकारच्या २-३ हजार कोटींच्या जमिनीत प्रत्यक्ष भागिदारी असेल तर त्यांना त्या पदावर राहण्याचा अजिबात अधिकार नाही. हे या प्रकरणी आवर्जुन सांगितले गेले पाहिजे.

# वर्दीचा रुद्रावतार; गुन्हेगारांनी खबरदार!

## जनतेचा रक्षक बनून केजमध्ये उतरले IPS श्री.व्यंकटराम

दैनिक वादळ वार्ता

**केज । प्रतिनिधी**

केज तालुक्यात कायदा-सुव्यवस्थेची नवी दिशा ठरवणारा क्षण समोर आला आहे. नव्याने नियुक्त झालेले IPS श्री. व्यंकटराम यांनी पदभार स्वीकारताच गुन्हेगारीविरोधात उघड युद्ध घोषित केले आहे. केवळ प्रशासकीय भाषण नव्हे, तर कृतीतील कठोरता आणि जनहितातील संवेदनशीलता यांचा संगम त्यांच्या पहिल्या पत्रकार परिषदेत दिसून आला.त्यांनी स्पष्ट शब्दांत सांगितले कायद्याने रहा. गुन्हेगारांनी खबरदार. कोणताही अवैध धंदा, कोणताही अन्याय, कोणतीही दहशत आता चालणार नाही.





### अवैध धंदे बंद गुन्हेगारीला शून्य सहनशीलता

गेल्या काही महिन्यांत शहरात मटका-जुगार, अवैध व्यवहार, सूडगिरी व स्थानिक टोळ्यांची वर्दळ वाढत असल्याच्या तक्रारींचा त्यांनी गंभीर घेऊन कारवाईचा पहिला धडाका दिला. मा. पोलीस अधीक्षक सो बीड व मा. अपर पोलीस अधीक्षक सो अंबाजोगाई यांच्या मार्गदर्शनाखाली दि. २७.१०.२०२५ रोजी दुपारी १४.०० वाजता मंगळवार पेठ परिसरात मटका-जुगारांवर धाड टाकण्यात आली. या पोलिस पथकात पोह/९९६ डापकर, पोह/१३८४ चोपने, पोह/६९३ निरडे, पोअं/१८८४ टकले, पोअं/३६१ करांडे यांचा समावेश होता. या पथकाने इंडीया गॅस सर्विस समोर,जय हनुमान मोटार रिवायडींग समोर,फेमस चिकन सेंटर समोर,येडेश्वर सर्विसिंग सेंटर समोर,बस स्थानकाजवळील अनिल हॉटेल समोर या ठिकाणी धाड टाकली असुन रामदास दाराव चटप जानेगाव १०२०/-शेख अब्दुल करीम मंगळवार पेठ २३५०/-अंबादास गोंदणे धारूर रोड ९१०/-ईस्माईल मासूम शेख केज ३००/-रविंद्र वाघमारे फुलेनगर २५६०/-एकूण जप्त : ७१४०/- + कल्याण मटका साहित्य या पाचही इसमांवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास सुरू आहे.ही कारवाई केवळ धाड नव्हे, तर गुन्ह्यांविरोधातील नव्या कालखंडाची घोषणा असल्याचे शहरात चर्चेत आहे.

### अवैध उत्खननावर करडी नजर

नदी, ओढे-नाले आणि पाझर तलावाच्या वाळू/माती उत्खननावरही त्यांनी कठोर भूमिका घेतली.सरकारी संपत्ती ही जनतेची आहे. अवैध उत्खनन करणार म्हणजे राज्याला लुटणार. यासाठी थेट गुन्हा व जप्ती कारवाई होईल असे त्यांनी सांगितले. यावेळी राजकीय किंवा सामाजिक कवच कोणालाही ढाल ठरणार नाही, हे त्यांचे स्पष्ट विधान.

### कोणताही त्रास, धमकी, दडपशाही,

अन्याय-थेट माझ्याशी संपर्क करा माझे दरवाजे केवळ खुले नाहीत, तर तुमच्यासाठीच आहेत. यामुळे पोलिस प्रशासनाला 'जनतेपासून जनतेपर्यंत' पोहोचवण्याची भूमिका त्यांनी दृढ केली.

### बालकामगार समस्येवर थेट हस्तक्षेप

पत्रकार परिषदेत श्री. व्यंकटराम म्हणाले कि बालकामगार म्हणजे एका मुलाच्या आयुष्याचा श्वास गुदमरवणे. हे सामाजिक अपराध आहे. बाल कामगारांवर विशेष मोहीम राबवली जाईल. शाळा-महाविद्यालयांशी समन्वय, समुपदेशन आणि नोंदणी यंत्रणा अधिक सक्षम केली जाणार आहे.

### कारवाई झाल्या पासून शहरात चर्चा

केजमध्ये आता कायद्याचा आवाज परतला आहे!गुन्हेगारी घटकांमध्ये भीती निर्माण झाली असून नागरिकांमध्ये सुरक्षिततेची भावना व तरुणाईमध्ये कायदेशीर जबाबदारीची जाणीव निर्माण झाली आहे.केजमध्ये पोलिस वर्दीचा नवीन अर्थ निर्माण झाला आहे. वर्दी आता फक्त शिस्तीसाठी नाही, तर जनतेच्या रक्षणासाठी आहे हे यावरून सिद्ध होते.

## नंदुरबारच्या सेवेत 'ई-स्पीड'! माजी मंत्री डॉक्टर विजयकुमार गावित यांच्या हस्ते १० इलेक्ट्रिक बस सेवेचा शानदार प्रारंभ

दैनिक वादळ वार्ता

**नंदुरबार । दिपक गोसावी**

नंदुरबार बस आगाराच्या सेवेत आधुनिकतेची भर पडली असून, महाराष्ट्राचे माजी आदिवासी विकास मंत्री तथा आमदार डॉक्टर विजयकुमार गावित यांच्या हस्ते दिनांक २७ ऑक्टोबर २०२५ रोजी ई बस सेवेचा शानदार शुभारंभ करण्यात आला.



सध्या नंदुरबार बस आगारात १० इलेक्ट्रिक बस दाखल झाल्या असून, या हरित आणि गतिमान सेवेमुळे प्रवाशांना अधिक सुखकर प्रवासाचा अनुभव मिळणार आहे. डॉक्टर विजयकुमार गावित यांच्या हस्ते औपचारिक उद्घाटन करण्यात आले.

यावेळी बोलताना आमदार डॉक्टर विजयकुमार गावित यांनी ई बस सेवेमुळे बस आगाराची सेवा अधिक गतिमान होईल, अशी अपेक्षा व्यक्त केली. नंदुरबार जिल्ह्यातील बस सेवा आणखी सुधारित व्हावी, तसेच ग्रामीण भागातील प्रवाशांचा प्रवास अधिक सुखकारक व्हावा, या हेतूने हे आधुनिकीकरण महत्त्वाचे असल्याचे त्यांनी नमूद केले. उपस्थित प्रमुख अधिकाऱ्यांशी संवाद साधताना डॉक्टर विजयकुमार गावित यांनी प्रवाशांच्या समस्या, बस आगारातील उपलब्ध सेवा आणि अडचणी यांची माहिती घेतली. बस आगारासाठी एकूण ४२ इलेक्ट्रिक बसची मागणी करण्यात आलेली असून, सद्यस्थितीत १० बस सेवेत दाखल झाल्याची माहिती संबंधित अधिकाऱ्यांनी दिली.

या महत्त्वपूर्ण प्रसंगी विभाग नियंत्रक पुरुषोत्तम व्यवहारे, विभागीय वाहतूक अधिकारी (धुळे) सौरभ देवरे, आगार व्यवस्थापक संदीप निकम यांच्यासह माजी नगरसेवक आनंदा माळी, लक्ष्मण माळी, माजी जिल्हा परिषद सदस्य सागर तांबोळी, अवजड वाहतूक व्यवस्थापक रमेश वळवी, सुपरवायझर नीरज गोराखळे आणि रवी मिस्तरी आदी मान्यवर उपस्थित होते. उद्घाटन समारंभानंतर माजी मंत्री डॉक्टर विजयकुमार गावित यांनी स्वतः बसमध्ये बसून प्रवास केला आणि प्रवाशांना व बस आगाराला शुभेच्छा दिल्या. नंदुरबारच्या सार्वजनिक वाहतूक सेवेसाठी हा एक महत्त्वाचा टप्पा ठरला आहे.

## परळी येथे भाजपचा दिपावली स्नेह संपन्न, पंकजाताई यांनी फुंकले निवडणूकीचे रणशिंग



दैनिक वादळ वार्ता

**परळी । प्रतिनिधी**

परळी येथे रविवारी दीपावली स्नेहमिलन कार्यक्रमाचे आयोजन केले होते.बीडजिल्ह्यातील भाजपाचे ज्येष्ठ नेते तसेच पदाधिकारी,कार्यकर्ते,बुथ प्रमुख,सरपंच,विविध संस्थांचे संचालक आणि मुंडे कुटुंबावर प्रेम करणारे असंख्य नागरिक याप्रसंगी उपस्थित होते.


या निमित्ताने बीड जिल्ह्या तील सर्वांशी संवाद साधता आला.आपल्या राजकीय प्रवासात, चांगल्या आणि वाईट काळात साथ देणाऱ्या सर्वांप्रति कृतज्ञता व्यक्त केली तसेच सर्वांना दिवाळीच्या शुभेच्छा ही दिल्या,जिल्ह्यातील सर्व मान्यवरांनी व कार्यकर्त्यांनी देखील भाऊबीज निमित्त सर्वांना शुभेच्छा दिल्या.याप्रसंगी माजी राज्यमंत्री बदामराव पंडित व माधवराव तात्या निर्मळ यांनी भारतीय जनता पक्षात जाहीर प्रवेश केला.दोघांचेही पक्षात स्वागत करून त्यांचा यथोचित सन्मान राखला जाईल अशा शुभेच्छा दिल्या.यावेळीमाजी खासदार डॉ. प्रितमताई मुंडे,बाळराजे पवार,जिल्हाध्यक्ष शंकर भाऊ देशमुख,बीड जिल्ह्यातील प्रमुख पदाधिकारी आणि असंख्य कार्यकर्ते याप्रसंगी उपस्थित होते.तत्पूर्वी देशाचे सन्माननीय पंतप्रधान नरेंद्रजी मोदी यांचा 'मन की बात' कार्यक्रमाचा उपस्थित कार्यकर्त्यांनी मोठया स्क्रीनवर पाहिला.या दिवाळी स्नेहमिलन कार्यक्रमानंतर कार्यकर्त्यां मध्ये उत्साहाचे वातावरण तयार झाले आहे.

## भरधाव मोटारसायकलने पादचाऱ्याला उडवले; गंभीर जखमी शहादा-लांबोळा रस्त्यावर अपघात

दैनिक वादळ वार्ता

**नंदुरबार । दिपक गोसावी**

भरधाव वेगात आणि निष्काळजीपणे दुचाकी चालविल्यामुळे शहादा-लांबोळा रस्त्यावर एका पादचाऱ्याला गंभीर दुखापत झाल्याची घटना दि. २२ ऑक्टोबर रोजी सायंकाळी ७:३० वाजताच्या सुमारास घडली. मनरद गावाजवळील शरद पाटील यांच्या शेतानजीक ही दुर्घटना झाली.




फिर्यादी आशाबाई राजु ठाकरे यांनी शहादा पोलीस ठाण्यात दिलेल्या माहितीनुसार, त्यांचे पती राजू दुल्लभ ठाकरे (रा. लांबोळा) हे दि. २२/१०/२०२५ रोजी सायंकाळी शहादा येथून लांबोळा गावाकडे पायी येत होते. याचवेळी लांबोळा येथील पावभा संजय कोळी हा त्याची हिरो स्प्लेंडर प्लस (क्र.एम एच ३९ ऐ एच - ४६८३) घेऊन आपल्या पाठीमागे सोनु किशोर कोळी आणि मोहन वेडु कोळी यांना बसवून भरधाव वेगात येत होता. कोळी याने रस्त्याच्या परिस्थितीकडे दुर्लक्ष करत, निष्काळजीपणे आणि वेगाने दुचाकी चालवून राजू ठाकरे यांना मागून जोरदार धडक दिली. या धडकेत राजू ठाकरे यांच्या डोक्याला गंभीर दुखापत झाली आहे. अपघात होताच आरोपी पावभा कोळी हा घटनास्थळावरून दुचाकीसह पळून गेला. या अपघातात राजू ठाकरे यांच्यासह दुचाकीवर असलेले तिघेही जखमी झाले आहेत. पावभा कोळी यांच्या हातावर, सोनु कोळी यांच्या डोक्याला आणि मोहन कोळी यांच्या पायाला मार लागला आहे. या घटनेप्रकरणी आशाबाई राजु ठाकरे यांच्या तक्रारीवरून आरोपी पावभा संजय कोळी (रा. लांबोळा) विरोधात शहादा पोलीस ठाण्यात दि. २६/१०/२०२५ रोजी गुन्हा दाखल करण्यात आला आहे. शहादा पोलीस ठाण्यात भारतीय न्याय संहिता (बी एन एस) आणि मोटार वाहन कायद्याच्या संबंधित कलम २८१. १२५. ३२४ (४) (५) सह मो वा का क १८४. ७ प्रमाणे १३४/१७ नुसार गुन्हा नोंदवण्यात आला आहे. या प्रकरणाचा पुढील तपास पोलीस नाईक कैलास तावडे हे करीत आहेत, अशी माहिती पोलीस ठाण्याचे प्रभारी अधिकारी पोलीस निरीक्षक निलेश देसले यांनी दिली.

## डॉ.संपदा मुंडे यांना न्याय मिळवून देण्या साठी प्रयत्नशील; श्री.रमेशराव आडसकर यांची मुंडे कुटुंबीयांची घेतली सांत्वनपर भेट



दैनिक वादळ वार्ता

**केज । प्रतिनिधी**

बीड जिल्ह्याची लेक डॉ. संपदा मुंडे यांच्या निधना नंतर जिल्हा भरात शोककळा पसरली आहे. या घटनेने संपूर्ण मराठवाडा हादरून गेला असून,डॉ.संपदा मुंडे यांना न्याय मिळवून देण्यासाठी विविध स्तरांवर मागणी होत आहे.या पार्श्वभूमीवर अंबेजोगाई सहकारी साखर कारखान्याचे चेअरमन तसेच माजलगाव मतदारसंघाचे ज्येष्ठ नेते श्री.रमेशराव आडसकर यांनी दि.२७ ऑक्टोबर रोजी सोमवारी मुंडे कुटुंबीयांची भेट घेऊन त्यांना दिलासा दिला.या भेटी प्रसंगी बोलताना श्री.रमेशराव आडसकर म्हणाले की, बीड जिल्ह्याची ही लेक केवळ एका कुटुंबाची नव्हे,तर संपूर्ण जिल्ह्याचा अभिमान होती.तिच्या निधनाने आपण सर्वजण व्यथित आहोत.लेकीला न्याय मिळवून देण्यासाठी आम्ही सर्वतोपरी प्रयत्न करू.मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्री यांची भेट घेऊन या प्रकरणाचा तपास वेगाने आणि निष्पक्षपणे व्हावा या साठी आम्ही प्रयत्नशील राहू.दोषींवर कठोरात कठोर कारवाई व्हायलाच हवी, असे त्यांनी स्पष्ट केले.यावेळी त्यांच्या सोबत जगदेश फरताडे, मनोहर तात्या डाके, मचिंद्रबप्पा झाटे, बालासाहेब बादाडे,दत्ता काका डाके सर तसेच इतर मान्यवर उपस्थित होते.शोकाकुल मुंडे कुटुंबीयांनी या भेटी दरम्यान आपल्या भावना व्यक्त करताना न्याय मिळवण्यासाठी जनतेने साथ द्यावी,अशी विनंती केली.डॉ.संपदा मुंडे यांच्या अकालीनिधनामुळे बीड जिल्ह्यातील नागरिकांमध्ये संताप व दु:खाचे वातावरण आहे. समाजातील विविध घटकांकडून याप्रकरणाची सखोल चौकशी करून दोषींना कठोर शिक्षा व्हावी,अशी मागणी होत आहे.

## ग्रामीण भागातील शेतकऱ्यांना दीपावली निमित्त किराणा वाटप

### महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ व दैनिक समर्थ गांवकरी समूहाचा उपक्रम



दैनिक वादळ वार्ता **बीड । प्रतिनिधी**

ग्रामीण भागातील शेतकऱ्यांना पूरामुळे मोठा आर्थिक फटका बसला आहे.अनेकांच्या घरातील धान्यसाठा,शेती तील पिके व जनावरांचे चारा याचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे.अशा संकटग्रस्त शेतकऱ्यांना दिलासा देण्यासाठी महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ व दैनिक समर्थ गांवकरी समूह यांच्या वतीने दीपावली सणानिमित्त किराणा वाटप करण्यात आले.महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे राज्य सरचिटणीस व दैनिक समर्थ गांवकरी चे संपादक डॉ.विश्वासराव आरोटे यांच्या संकल्पने तून हा उपक्रम राबविण्यात आला.या उपक्रमाअंतर्गत पूरग्रस्त शेतकऱ्यांना त्यांच्या घरपोच किराणा वाटप करून सामाजिक बांधिलकीची जाणीव ठेवण्यात आली.या उपक्रमामुळे अनेक शेतकऱ्यांच्या कुटुंबीयां च्या चेहऱ्यावर आनंद फुलला असून, दीपावलीचा खरा प्रकाश त्यांच्या घरात पोंहोचविण्याचे कार्य समर्थ गांवकरी समूहाने केले आहे.स्थानिक नागरिकांनी,शेतकऱ्यांनी या सामाजिक कार्याचे मनःपूर्वक स्वागत केले आहे.

## संपादकीय

# गाझा पट्टी पुन्हा अशात

गेल्या दोन दिवसांपासून गाझा पट्टी येथील इस्त्रायली सैनिकांनी तीव्र हल्ले तर केले असून युद्धविराम झाल्यानंतर जे शांततेचे वातावरण निर्माण झाले होते ते आता पार उद्ध्वस्त झाले आहे. युद्धविरामापूर्वी जवळपास गाझावासीयांना ६०० दिवस बॉम्बहल्ल्यांचा सामना करावा लागला होता. गाझामधील ४६,००० अधिक लोक मारले गेले आहे. त्या हिंसाचाराची पुन्हा आठवण ताजी व्हावी अशीच परिस्थिती सध्या गाझा पट्टीत आणि तेथील रफा परिसरात आहे. मारलेल्या लोकांपैकी १८,००० मुले आहेत. यावरून गाझामधील परिस्थिती किती भीषण आहे हे लक्षात यावे. अर्थात यास दोन्ही बाजू दोषी आहेत हे विसरून चालणार नाही. कारण एकीकडे हमास युद्धबंदी स्वीकारते पण तिचे पालन करत नाही आणि दुसरीकडे इस्त्रायली सैन्य तर याचीच वाट पाहत असते, की कधी युद्धबंदी मोडता येईल. यात मानवतेचा मात्र मुडदा पडतो. गाझामध्ये शांतता करार अमलात आणायचा असेल तर तो पूर्णपणे आणि खऱ्या अर्थाने अमलात आला पाहिजे. पण प्रत्यक्षात तसे होत नाही. आताची युद्धबंदी ही तात्पुरती आणि वरवरची होती. त्यातून खऱ्या अर्थाने शांतता प्रस्खापित झाली नाही. कायमची शांतता प्रस्थापित झाली तरच युद्धबंदीला काही अर्थ राहील. पण तसे होत नाही हे तर दुःख आहे. याला इस्त्रायल जितके दोषी आहे तितकेच हमासही आहे.पॅलेस्टाईनचा गाझा भूमीवरील कब्जा हा अवैध असल्याने हा संघर्ष संपू शकत नाही असा पॅलेस्टाईनच्या पक्षपाती लोकांचा दावा असतो. पण ते हमासच्या अतिरेकी कारवायांकडे हेतूतः दुर्लक्ष करतात. हमास आणि इस्त्रायलने एकमेकांवर कराराचा भंग केल्याचा आरोप केला आहे, तर आपल्याला शांततेचे नोबेल पारितोषिक मिळावे म्हणून जो अट्टहास केला त्या ट्रम्प यांनी अजूनही गाझामध्ये युद्धबंदी कायम आहे असे म्हटले आहे. पण असे म्हणणे म्हणजे आत्मवंचना ठरेल. इस्त्रायली सैनिकांनी केलेल्या गोळीबारात ४ लोक ठार झाल्याचे म्हटले आहे. ट्रम्प यांच्या युद्धबंदी करारानंतर हा या भागातील संघर्षाचा सर्वात वाईट दिवस आहे असे जे म्हटले गेले ते अगदी रास्त आहे. गेल्या आठवड्यात ट्रम्प यांनी इजिप्तमधील शर्म एल शेखमध्ये जागतिक नेत्यांसमोर बोलताना मध्यपूर्वेतील शांतता प्रस्थापित केली आहे असा दावा केला होता. पण त्या दव्याची शाई वाळतही नाही तोच इस्त्रायल आणि हमास यांच्यातील रक्तरंजित संघर्षात प्राणहानी झाल्याने युद्धबंदी मोडीत निघाल्याची बातमी ट्रम्प यांची विश्वासार्हता संपल्याची जाणीव करून देते. इस्त्रायली युद्धविमाने पुन्हा सक्रिय झाली आहेत आणि भविष्यात पुढे आणखी काय वाढून ठेवले आहे याची प्रचिती येते. हमासने अद्याप शस्त्रे हाती घेतलेली नाहीत तरीही अमेरिकेने युद्धबंदी कायम राहण्यासाठी या प्रांतात पुढाकार घेण्याची आवश्यकता आहे. कारण अमेरिका जेव्हा दुसऱ्या महायुद्धात उतरली तेव्हाच युद्धाचा निकाल लागला होता.त्यामुळे आता ट्रम्प यांना केवळ युद्धबंदी कायम आहे असे म्हणून आपली जबाबदारी झटकता येणार नाही, युद्धबंदीचे उल्लंघन कुणी केले हा वादाचा प्रश्न आहे. कारण इस्त्रायली सैन्याने हमासने अगोदर युद्धबंदीचा भंग केल्याचा आरोप केला तर इस्त्रायली सैन्याने केवळ हमासच्या हल्ल्यांना उत्तर दिले असे म्हटले आहे. त्यामुळे या वादात न जाता आता शक्तिशाली लोकांनी यातून मार्ग काढावा आणि लोकांना शांततेच्या मार्गाने जाण्यास मदत करावी असाच सर्वसामान्य लोकांचा आग्रह आहे. हमास आणि इस्त्रायली सैनिक यातील कोण खोटे बोलत आहे हे सांगणे अवघड आहे. युद्धबंदीचे उल्लंघन झाले हे उघड आहे आणि ते कुणाच्या आगळीकीने झाले हे या क्षणी बाजूला ठेवले तरीही गाझामध्ये आजची वेळ अत्यंत चिंताजनक आहे हे निश्चित आहे. हमासने इस्त्रायलवर युद्धबंदी भंग केल्याचा आरोप करणे आणि इस्त्रायलने तसाच आरोप करणे यातून काहीही प्रश्न सुटणार नाही. गाझामधील निरपराध लोक मात्र मारले जात राहतील आणि त्यांना न्याय देणारा कुणी नसेल. कोणताही धर्म यात माघार घेण्यास तयार नाही. गप्पा मात्र सारे मानवतेच्या मारतात. पण मानवतेचा सर्वात जास्त मुडदा याच भूमीवर पडला आहे. हा इतिहास आहे.त्यामुळे इस्त्रायल आणि पॅलेस्टिनी यांच्यातील या युद्धबंदीला अगोदरच ताण बसला होता. जराही हिंसक घटनेनंतर ती युद्धबंदी कोसळली आणि तीच आज शक्यता दिसत आहे. आता तर इस्त्रायलने गाझामध्ये मदत पाठवणे बंद केले आहे. दोन वर्षांच्या विनाशकारी संघर्षांनंतर ट्रम्प यांच्या मध्यस्थीने शांतता प्रस्थापित झाली आणि हिंसाचार आटोक्यात आला होता, पण आता पुन्हा ते दिवस आता परतले आहेत. या पूर्वीही हमास आणि इस्त्रयायल यांच्यात युद्धबंदी लागू झाली होती. पण ती अनेकदा तुटली तसेच यंदाही झाले. कारण अत्यंत घाईघाईने प्रश्नाचा साकल्याने विचार न करता ती अमलात आणली गेली, त्यामुळे युद्धबंदी तुटणारच होती. तसेच झाले आहे. युद्धविराम पार पाडण्यासाठी ट्रम्प यांच्याकडे दृढनिश्चय आहे का हा मूळ प्रश्न आहे. वाटाघाटी गंभीरपणे करण्याची अमेरिकेची म्हणजे ट्रम्प यांची खरोखर इच्छा आहे का हाही तितकाच महत्त्वाचा प्रश्न आहे. युद्धबंदी यशस्वी होत नाही किंवा झाली नाही याला कारण आहे कारण ट्रम्प यांचे सर्व काही आपल्यालाच माहीत आहे असे वाटणारे धोरण. त्यांच्या दिखाऊपणाचे परिणाम दोन्ही बाजूंना भोगावे लागत आहेत हे वास्तव आहे.इस्त्रायली नेतृत्व आणि हमासचे नेते यांच्याकडे वचनबद्धता असली तरीही त्यांच्याकडे असे काही स्पॉयलर गट आहेत की जे दृष्टिपथात असलेली शांतता प्रत्यक्षात येऊ देत नाहीत. आता ट्रम्प यांनी शांतता करार अमलात आणल्याबद्दल स्वतःची पाठ थोपटून घेतली असली तरीही मध्य पूर्वेत किंवा पश्चिम आशियात ट्रम्प यांचा प्रभाव पूर्वीसारखा राहिला नाही हेच वास्तविक कारण आहे. त्यामुळे शांतता करार होतील आणि ते काही काळ चालून मोडले जातील. सध्या गाझाची जनता मात्र वाऱ्यावर आहे आणि तिला वालीही कुणी उरलेला नाही हे सत्य आहे.

# माहिती तंत्रज्ञान उजळवतेय शिक्षणक्षेत्र

इतर क्षेत्रांप्रमाणेच शिक्षणक्षेत्रातही माहिती तंत्रज्ञानाचा वापर वाढला असून एक प्रकारची क्रांती अनुभवायला मिळत आहे. तांत्रिक विषयांसह इतरही सर्वच विद्याशाखांच्या अभ्यासकांना माहिती तंत्रज्ञानाने विविध प्रकारे सहाय्य केले आहे. खेरीज इलेक्ट्रॉनिक संवादमाध्यमे वापरून शाळा-कॉलेजांमध्ये दिल्या जाणाऱ्या पारंपरिक शिक्षणातही बदल घडले असून दूरशिक्षणासारखे मार्ग आता प्रत्येकाच्या आवाक्यात आले आहेत.

नव्या युगात शिक्षणक्षेत्रामध्ये नवतंत्रज्ञानाचे महत्त्व वाढले आहे. महत्त्वाचे म्हणजे हा बदल ग्रामीण भागातही पाहायला मिळत असून माहिती तंत्रज्ञानाने शिक्षणाच्या क्षेत्रात घडवून आणलेली क्रांती आपण सर्वजण पाहत आहोत. तांत्रिक विषयांसह इतरही सर्वच विद्याशाखांच्या अभ्यासकांना माहिती तंत्रज्ञानाने विविध प्रकारे सहाय्य केले आहे. खेरीज इलेक्ट्रॉनिक संवाद माध्यमे वापरून शाळा-कॉलेजांमध्ये दिल्या जाणाऱ्या पारंपरिक शिक्षणातही बदल घडले असून दूरशिक्षणासारखे मार्ग आता प्रत्येकाच्या आवाक्यात आले आहेत. ताज्या निष्कर्षानुसार सर्वाधिक तरुण लोकसंख्या असणाऱ्या देशांमध्ये भारताचा क्रमांक खूपच वरचा आहे. अर्थातच देश प्रगतिपथावर ठेवण्यासाठी आणि वैयक्तिक जीवनमान उंचावण्यासाठी तरुणाईला योग्य शिक्षण-प्रशिक्षण देण्याची मोठी गरज आहे. तरुणाईला विकास हवा आसल्याचे त्यांनी विविध मार्गाने स्पष्ट केले आहे.

आजच्या शाळकरी तसेच कॉलेजवयीन विद्यार्थ्यांची शिक्षण घेण्याची तीव्र इच्छा आहे; परंतु आतापर्यंतच्या धोरणांमुळे म्हणा वा अन्य कारणांनी म्हणा, त्यांना पुरेशी संसाधने पुरवण्यात यंत्रणा नेहमीच कमी पडली आहे. बरे रस्ते, अन्नपाणी, कपडे, वह्या-पुस्तके, घरातील परिस्थिती आणि आसपासचे वातावरण आदी सामाजिक-आर्थिक बाबींमध्ये अपूर्णत्व असूनही छोटी मुले-मुलीदेखील चार-चार मैल चालून शाळेत जाताना आपण पाहतो आणि हळहळतो, कारण सर्व संसाधने पुरवणे कधी कधी प्रशासनालाही अवघड असते. दुसरीकडे, बहुसंख्य विद्यार्थी इंग्रजी माध्यमाच्या आणि खासगी शाळांमध्ये जातात, असा अनेकांचा समज असतो. काही अंशी हे खरे आहे. पण हे चित्र शहरी आणि तुलनेने संपन्न ग्रामीण भागात बघायला मिळते, हे विसरून चालणार नाही. आजही सर्वाधिक विद्यार्थी सरकारी शाळांमध्ये शिकतात आणि इतक्या व्यापक प्रमाणावर अशा प्रकारे शिक्षण पुरवणारी भारतातील सरकारी यंत्रणा जगात सर्वात मोठी आहे. मात्र इतक्या विस्तृत आणि सुस्थापित शैक्षणिक जाळ्यांचा वापर दर्जेदार शिक्षण देण्यासाठी केला जात नाही हे आपल्या यंत्रणेचे अपयश म्हणजे देशाचे दुर्दैव म्हणावे लागेल. या पार्श्वभूमीवर इंटरनेटने कशी क्रांती घडवली आहे ते पाहणे गरजेचे ठरते. ग्रामीण आणि दुर्गम भागातल्या विद्यार्थ्याला एखाद्या अभ्यासक्रमाची माहिती हवी असेल तर अगदी अलीकडेपर्यंत तो मिळेल त्या वाहनाने किंवा खरे तर बरेचदा चक्क चालतच तालुक्याचे गाव गाठत असे. तिथे एखादी चांगली शिक्षणसंस्था असेल तर ठीक, नाही तर पुन्हा प्रवास करून तो जिल्ह्याच्या ठिकाणी किंवा शहरात येईल. संबंधित संस्थेचा पत्ता शोधून कार्यालयातून माहिती मिळवण्यात त्याचे दोन-तीन दिवस सहज जात. एवढ्या उद्योगानंतर त्याला योग्य ती माहिती मिळाली असेल तर ठीक, अन्यथा अजून कळले नाही, नोटीस निघालेली नाही, चार दिवसांनी फोन करा किंवा येऊन बोर्डावर पाहा असे उत्तर मिळाले की पुन्हा पुढच्या आठवड्यात हीच यात्रा काढण्याखेरीज पर्याय नसायचा. हा विद्यार्थी एकट्याने प्रवास करण्याइतका मोठा नसेल तर सोबतीला वडील, काका-मामा अशांना जावे लागायचे. म्हणजे दुप्पट खर्च आणि तेवढीच यातायात. इथे मुलींची म्हणजे विद्यार्थिनींची परिस्थिती तर आणखी बिकट व्हायची. मुलींनी शिकायचेच कशाला, मुलीच्या शिक्षणावर खर्च करून आमचा फायदा काय असे प्रश्न आपल्याकडे अजूनही विचारले जात असल्याने तिची पुढची शैक्षणिक वाट तर बहुधा बंदच होऊन जाते. मात्र अशा सरस्वतीच्या लेकीच्या आयुष्यात इंटरनेट महत्त्वाची क्रांती घडवू शकते, हे आता सर्वांना समजले आहे.विषयाचे चांगले आकलन होण्यासाठी किंवा तो अधिक प्रभावीपणे मांडण्यासाठी आपण शिक्षणाचे दोन भाग करू या. शालांत परीक्षेपर्यंतचे आणि त्यानंतरचे, असे हे दोन भाग करता येतील. नंतरच्या शिक्षणामध्ये अधिक पर्याय असल्यामुळे समजून घेऊन त्यानुसार कृती करण्यात आणि विद्यार्थ्यांच्या भावी आयुष्याची दिशा ठरवण्यात माहिती तंत्रज्ञान मोठी भूमिका बजावते. शिक्षा अभियानासंबंधी माहिती देणाऱ्या या वेबसाइट्स वापरून एखाद्या राज्यातील एखाद्या तालुक्यामध्ये कोणत्या शाळा, कोणत्या गावात आहेत हे शोधता येते. आयुष्यात एका टप्प्यानंतर विद्यार्थ्यांना शिक्षण सोडावे लागते ते त्यासाठी येणाऱ्या खर्चामुळे. सध्या उच्चशिक्षण, तर भयंकर महाग होत चालले आहे. अशा वेळी पात्र आणि हुशार विद्यार्थ्यांना विविध शिष्यवृत्त्या अर्थात स्कॉलरशिप्स पुरवणाऱ्या असंख्य व्यक्ती आणि संस्था आहेत. इंटरनेटच्या कृपेने झाडून अशा साऱ्या शिष्यवृत्त्यांची माहिती काही क्लिक्समध्ये झटपट मिळू शकते. यासाठी स्कॉलरशिप्स किंवा फ्रीशिप्स असा सर्च द्यावा. अर्थात हे काम करण्यासाठी आपण 'शिक्षा'च्या वेबसाइटचाच वापर केला पाहिजे असे नाही; हा शोध सर्च इंजिन उघडून स्वतंत्रपणेही घेता येतो. शिक्षणक्षेत्रात आयटीचा इतक्या खोलवर शिरकाव झाल्याने विद्यार्थ्यांना करावी लागणारी अनुत्पादक पायपीट आणि खर्चात मोठी बचत झाली असून अधिक नेमकपणाने संस्थांची निवड करणे आता शक्य झाले आहे. अशा उपक्रमांमध्ये प्रौढ शिक्षण, कामगारांसाठीच्या रात्रशाळा तसेच अपंग आणि विकलांग विद्यार्थ्यांनाही नवतंत्राचा खूपच फायदा मिळू शकतो. आजच्या तरुणाईसाठी 'करिअर' हा शब्द अतिशय महत्त्वाचा ठरतो. या शब्दाचे ढोबळमानाने भाषांतर 'उपजीविकेसाठी केलेले काम किंवा व्यवसाय' असे होत असले तरी एखाद्याच्या जीवनशैलीच्या आणि मुख्य म्हणजे जीवनपद्धतीच्या संदर्भात करिअर या शब्दाचे नव्हे, तर संकल्पनेचे वजन निश्चितच जास्त भरते. आपल्या आवडीच्या क्षेत्रात काम केल्याने मिळणारे मानसिक समाधान किती मोलाचे असते हे आणि असे अनेक मुद्दे यावेळी विचारात घेतले जातात. मात्र व्यावहारिक पातळीवर पाहता केलेल्या कामातून मिळणारे उत्पन्न हाच निकष बहुसंख्य प्रकरणांमध्ये पाळलेला आढळतो. याच अर्थाने 'करिअर' या संकल्पनेचा विचार केला आणि जरा मागे वळून पाहिले तर गेल्या शतकात म्हणजे सन २०००च्या थोडे आधीपर्यंत इंजिनीअर होणे ही बहुतेकांची महत्त्वाकांक्षा असे, असे म्हणता येईल; परंतु एकविसाव्या शतकाची सुरुवातच सर्वांचे जीवन व्यापणाऱ्या संगणक आणि संगणकाधारित प्रणालींनी झाली आणि इच्छुकांना करिअर करण्यासाठी सापडलेला नवा पैलू, नवे क्षेत्र म्हणजे कॉम्प्युटर.कॉम्प्युटर, इंटरनेट, त्यानंतर आलेला स्मार्टफोन आणि या तिघांचे त्रिकूट जमल्यामुळे वर उल्लेख केल्याप्रमाणे महानगरांपासून खेड्यांपर्यंत सर्वांच्याच जीवनात फरक पडला. खासगी, व्यावसायिक आणि औद्योगिक क्षेत्रांबरोबरच गेल्या पाच-दहा वर्षांमध्ये सरकारी विभागही संगणकीय सेवासुविधांवर चालू लागल्याने आणि त्या पुरवूही लागल्याने माहिती तंत्रज्ञान उर्फ 'आयटी सेक्टर'मध्ये प्रचंड मनुष्यबळाची आवश्यकता भासली. इलेक्ट्रॉनिक इंजिनीअर सोडाच, तुलनेने अगदीच प्राथमिक पातळीवरचे संगणकीय अभ्यासक्रम उत्तीर्ण होणाऱ्यांनाही थोड्याफार उमेदवारीनंतर नोकऱ्या सहज मिळत राहिल्या. महत्त्वाचे म्हणजे आयटीमध्ये बहुतेक सर्वांनाच अगदी सुरुवातीपासूनच भरपूर पगार मिळू लागला. पगाराला 'पॅकेज' असे संबोधण्याची लाटही बहुधा आयटीमधूनच उगम पावली. परिणामी, करिअर म्हणजे आयटी असे नवे समीकरण प्रस्थापित झाले. अर्थात या गोष्टीलाही आता पंधरा-वीस वर्षे झाली आहेत. या गेल्या पंधरा-वीस वर्षांमध्ये 'चेंज इज द ओन्ली कॉन्स्टंट थग' म्हणजेच 'बदल हीच सर्वात शाश्वत बाब आहे' या वाक्प्रचाराचा विसर पडू लागला. खरे तर संगणकीय विश्व इतक्या झपाट्याने बदलत आले आहे की, जुने तंत्रज्ञान किंवा पद्धती कालबाह्य होण्याचा वेग ('रोलओव्हर पीरिअड') इथे सर्वाधिक आहे. काही बाबतीत तर अक्षरशः गेल्या महिन्यातल्या प्रणालीची जागा या महिन्यात हाती आलेले नवतंत्रज्ञान घेते आहे. अर्थात इतके क्रांतिकारी बदल अत्युच्च पातळीवरच होत असले तरी कधी ना कधी शेवटच्या स्तरापर्यंत झिरपतात. त्यामुळेच आता संगणक साक्षरता ही कायम सुरू असणारी बाब बनली आहे.

# निसटून जाणा-या क्षणांना 'अक्षर' करण्याचा प्रयत्न

**दैनिक वादळ वार्ता । कोथरूड । प्रतिनिधी**

महाराष्ट्राला दिवाळी अंकांचा मोठा सांस्कृतिक वारसा आणि ११५ वर्षांची ऐतिहासिक परंपरा आहे.. अंगणात टाकलेला सडा, रांगोळी, आकाशदिवा, पणत्या, सुगंधी उटणं लावून केलेले अभ्यंग स्नान, अर्थात मोती साबण हवंच..

त्यानंतर चकली, चिवडा, तोंडात विरघळणारा बेसन लाडू, गरम खरपूस अनारसा आणि सोबत वैचारिक, सांस्कृतिक आणि साहित्यिक भूक भागवणा-या दिवाळी अंकांचं निवांत खुर्चीत बसून केलेलं वाचनहे महाराष्ट्रातल्या घराघरात दिसणारं दिवाळीतलं चित्रं. दिवाळीत फराळ जेवढा अपरिहार्य तेवढाच दिवाळी अंकही !

१९०९ साली का. र. मित्र यांनी पहिला दिवाळी अंक मनोरंजन काढलातेव्हापासून २०२५ पर्यंत ११६ वर्षांची ही परंपरा अखंड सुरू आहेदिवाळी अंक हा मराठी प्रकाशन विश्वातला एक प्रचंड उदयोग बनलेला आहे, तसेच ती अपरिहार्य अशी सांस्कृतिक गरजही बनलेली आहे. स्त्री विशेष ते ज्योतिष, अर्थकारण ते राजकारण अशा विविध विषयाला वाहिलेले अंक आपण पाहिले आहेत. पण उपनगरावर दिवाळी अंक निघणे हे दिवाळी अंकांच्या इतिहासात प्रथमच गेल्या वर्षी घडलं. पुणं ही महाराष्ट्राची सांस्कृतिक राजधानी आणि कोथरुड ही पुण्याची सांस्कृतिक राजधानी म्हटल्यास अतिशयोक्ती ठरणार नाही. तेव्हा कोथरुडवर दिवाळी अंक निघणं ही खासंच गोष्ट..कोथरुड दिवाळी अंकाचं हे दुसरं वर्ष.राज्याचे उच्च व तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांतदादा पाटील, फर्ग्युसन महाविद्यालयाच्या मराठी विभाग प्रमुख



डॉ. रुपाली शिंदे आणि सुप्रसिद्ध लेखक अभिजित जोग यांच्या उपस्थितीत हा दिवाळी अंक लोकार्पण सोहळा पार पडला. मीडिया नेक्स्ट पब्लिकेशन आणि मेनका प्रकाशनाने कोथरुड दिवाळी अंकाचं प्रकाशन केलं. अंकाचं सुरेख संपादन ज्येष्ठ पत्रकार अभय कुलकर्णी आणि कार्यकारी संपादक सुकृत करंदीकर यांनी केलं आहे. हा दिवाळी अंक सर्व कोथरुडकरांसाठी नि:शुल्क आहे हे महत्वाचं...शिवाय परदेशात राहणाऱ्या कोथरुडकरांना कुरिअरने चंद्रकांतदादा हा अंक पाठवणार आहेत.

अंकाविषयी बोलताना रुपाली शिंदे म्हणाल्या, मराठी सांस्कृतिक जीवनातील सर्वात महत्वाचे दोन उपक्रम आहेत.. एक म्हणजे साहित्य संमेलन आणि दुसरा अर्थातच दिवाळी अंक..

नवे कपडे, फराळ, फटाके यांच्यासह दिवाळीत दिवाळी अंक हवाच, ही मराठी माणसाची आग्रहाची मागणी असते.. सणाचा आनंदाला ज्ञानाची जोड असावी , ज्ञानाची दिवाळी साजरी करावी ही ज्ञानेश्वर माऊलींची मागणी होती... कोथरूड दिवाळी अंक ही पुण्याची सांस्कृतिक ओळख आहे.. आम्हास आम्ही पहावे चष्मा काढूनी पुन्हा एकदा ही त्या मागची भूमिका आहे. आज रि डेव्हलपमेंटच्या संक्रमणातून जाताना निसटून जाणारा गतकाळाला शब्दांत बांधून अक्षर करण्याचा हा प्रयत्न आहे.. सत्यभामेच्या अंगणातील पारिजातकाचा सडा रुक्मिणीच्या अंगणात पडला होता अशी एक कथा आहे.तसेच पुण्यात कोथरूड दिवाळी अंका सारखेच अनेक अंक प्रसिद्ध होऊ देत ही इच्छा रुपाली शिंदे यांनी व्यक्त केली. त्यांच्या भाषणातील 'रतीसुखाची दिवाळी' हा शब्द मला फारच आवडला...बोल्ड गोष्टी व्यक्त करताना त्या किती ग्रेसफुली सांगितल्या जाऊ शकतात त्याचं हा शब्द उदाहरण...अंकाचं मुखपृष्ठ वीरेंद्र तीखे यांनी जलरंगात फार अप्रतीम केलं आहे. पण या निमित्तानं विविध उपनगरांवर, शहरांवर असे अंक निघावेत जेणेकरुन दस्तावेजीकरण होईल...निवेदन करताना नेहमीप्रमाणे मजा आली. या निमित्तानं दिवाळी अंकाचा इतिहास वाचल्या गेल्या...या कार्यक्रमात वस्त्यांमध्ये राहणाऱ्या, झोपडपट्टीत राहणाऱ्या गर्भारशीण स्त्रियांचे नऊ महिन्याच्या गर्भारपणात मध्यमवर्गीय किंवा उच्च मध्यमवर्गीय स्त्रियांचे जसे लाड होतात तसे खाण्याचे डोहाळे पुरवायचे अशी एक व्यवस्था चंद्रकांतदादांनी केल्याचं कळलं. आणि खूप छान वाटलं. नाहीतर वस्तीत राहणाऱ्या बाईचं कसलं आलंय गर्भारपणाचं कौतुक...

# दिवाळीनंतर वाढत्या प्रदुषणाने खोकल्याचा त्रास सतावत असेल तर हे उपाय ठरतील उपयुक्त

दिवाळीच्या दिवसांमध्ये फटाक्यांच्या धुरामुळे वातारणातील प्रदुषण अधिक वाढले आहे. तर या वायू प्रदूषणामुळे अनेकांच्या आरोग्यावर वाईट परिणाम होत आहेत. या वाढत्या प्रदूषणामुळे अनेकांना श्वास घेण्यास तसेच खोकला, दम लागणे अशा अनेक आरोग्याच्या समस्या उद्भवू लागतात. कारण या वाढत्या प्रदूषणाचा आपल्या श्वसनसंस्थेवर सर्वात जास्त परिणाम होत असतो. त्यामुळे सतत खोकला येतो आणि श्लेष्माचे उत्पादन वाढते. कधीकधी हा खोकला बराच काळ राहतो त्यामुळे बरीच औषधे घेऊनही आराम मिळत नाहीत. तर अशा वेळेस आयुर्वेदिक उपाय उपयुक्त ठरू शकतात.

आयुर्वेदात म्हटले आहे की प्रदूषणामुळे कफ आणि वात दोष वाढतात, ज्यामुळे श्वसनाच्या समस्या उद्भवतात. अशा परिस्थितीत आयुर्वेदिक उपाय केवळ खोकला शांत करत नाहीत तर फुफ्फुसांना आतून बळकटी देतात. तर आजच्या लेखात आपण खोकल्यावरील आयुर्वेदिक उपायांबद्दल जाणून घेऊयात

**खोकल्यासाठी आयुर्वेदिक उपाय**

तुम्हाला जर औषधोपचार करूनही खोकला बरा होत नसेल तर तुम्ही आयुर्वेदिक उपाय करा. कारण सतत बाहेरील औषधे घेऊनही त्यांचा आपल्या शरीरावर परिणाम होत असतो. तर अशावेळेस अनेकजण हे आयुर्वेदिक औषधांना अधिक प्राधान्य देतात. या आयुर्वेदिक औषधांचे आपल्या आरोग्याला दुष्परिणाम होत नाही. तर खोकला कमी करण्यासाठी आयुर्वेदात अनेक प्रकारचे चहा सांगितलेले आहेत.



एका ग्लास कोमट पाण्यात मध आणि आल्याचा रस मिक्स करा आणि दिवसातून ३-४ वेळा प्या. आल्यामध्ये दाहक-विरोधी गुणधर्म असतात जे घशातील सूज कमी करण्यास मदत करतात, तर मध घशाला आराम देते.

याव्यतिरिक्त, ज्येष्ठमध खोकला कमी करण्यास देखील उपयुक्त आहे. त्याचे दाहक-विरोधी आणि अँटीऑक्सिडंट गुणधर्म घशाची जळजळ आणि पातळ श्लेष्मा कमी करण्यास मदत करतात. तुम्ही ज्येष्ठमधाचा तुकडा चावू शकता किंवा मधात ज्येष्ठमधाची पावडर मिक्स करून त्याचे सेवन करू शकता.

**तज्ञांनी दिलेल्या या टिप्सचेही पालन करा**

आयुर्वेदिक तज्ञ यांनी धुराची लर्जी असणाऱ्या लोकांना किंवा ज्यांना श्वसनाच्या समस्या आहेत त्यांना बाहेर पडताना तोंडाला मास्क लावावा. याव्यतिरिक्त, रात्री नाकात मोहरीच्या तेलाचे थेंब टाकणे यासारखे घरगुती उपाय देखील फायदेशीर ठरू शकतात. जर तुम्हाला आवडत असेल तर, मोहरीचे तेल तोंडात २० मिनिटे धरून ठेवा आणि नंतर धुवा. दमा असलेल्यांनी त्यांची औषधे सोबत ठेवावीत.

# पुण्यात मुरलीधर मोहोळ यांनी धिंगाणा घातला त्यांचा राजीनामा घ्या-वडेट्टीवारांची मागणी

दैनिक वादळ वार्ता
**मुंबई (वृत्तसंस्था)**

काँग्रेसचे ज्येष्ठ नेते विजय वडेट्टीवार यांनी पुण्यातील जैन बोर्डिंग जमीन विक्री प्रकरणी केंद्रीय राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ यांच्या राजीनाम्याची मागणी केली आहे. मुरलीधर मोहोळ यांनी केंद्रीय राज्यमंत्रिपदावर राहून पुण्यात जमिनीचा मोठा धिंगाणा घातला आहे. त्यामुळे त्यांना त्या पदावर राहण्याचा अजिबात अधिकार नसून, त्यांचा राजीनामा घेतला पाहिजे, असे ते म्हणालेत. यावेळी त्यांनी एलआयसीचा पैसा उद्योगपती गौतम अदानींच्या कंपनीत गुंतवल्याप्रकरणी सरकारवर चांगलेच तोंडसूख घेतले.केंद्रीय राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ यांच्यावर पुण्यातील जैन बोर्डिंगची जमीन कथितपणे विक्री करण्याचा घाट घातल्याचा आरोप आहे. सत्ताधारी शिवसेनेचे माजी आमदार रवींद्र धंगेकर यांनी या प्रकरणी त्यांना खिंडीत पकडले आहे. या प्रकरणी त्यांच्यावर चौफेर टीकेची झोड उठली असताना आता काँग्रेस विधिमंडळ पक्षाचे नेते विजय वडेट्टीवार यांनी त्यांच्या राजीनाम्याची मागणी केली आहे.विजय वडेट्टीवार रविवारी पत्रकारांशी बोलताना म्हणाले, केंद्रीय मंत्री मुरलीधर मोहोळ यांनी जे काही कारनामे केलेत ते आता उघड होत आहेत. ही तर केवळ सुरुवात आहे. त्यांनी तिकडे जमिनीच्या संदर्भात मोठा धिंगाणा घातला आहे. असा धिंगाणा सगळेच घालत आहेत. सध्या सगळीकडेच महाराष्ट्र लुटण्याचे काम सुरू आहे. वरपासून खालपर्यंत जमिनी लाटण्याचे काम सुरू झाले आहे. पण एक लक्षात घेतले पाहिजे की, मुरलीधर मोहोळ यांनी केंद्रीय राज्यमंत्रिपदाच्या पदावर राहून अशा प्रकारच्या २-३ हजार कोटींच्या जमिनीत प्रत्यक्ष भागिदारी असेल तर त्यांना त्या पदावर राहण्याचा अजिबात अधिकार नाही. हे या प्रकरणी आवर्जुन सांगितले गेले पाहिजे.



त्यांचा राजीनामा घेतला गेला पाहिजे.दुसरीकडे, विजय वडेट्टीवार यांनी एलआयसीचा पैसा अदानींच्या बचावासाठी वापरण्यात आल्यावरून पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वातील केंद्र सरकारवर निशाणा साधला आहे. ते म्हणाले, वॉशिंग्टन पोस्टच्या खळबळजनक बातमीनुसार, एल.आय.सी.मधील तुमचे-आमचे म्हणजे देशातील सामान्य करदात्यांचे तब्बल ३४,००० कोटी रुपये अदानी समूहाला वाचवण्यासाठी वापरले गेले. हा खुलासा प्रत्येक भारतीयासाठी धक्कादायक आहे, कारण एल.आय.सी.मध्ये गुंतवलेला पैसा हा सामान्य लोकांच्या घामाचा, मेहनतीचा आणि विश्वासाचा पैसा आहे. पण मोदी सरकारने विश्वासघात केला आहे.अदानी समूहावर गंभीर आर्थिक गैरव्यवहाराचे आरोप, चौकशा आणि आंतरराष्ट्रीय न्यायालयात खटले सुरू असतानाही, सरकारने सरकारी मालकीच्या एल.आय.सी.ला जबरदस्तीने अदानींच्या बाजूने उभं केलं, यामुळे कोट्यवधी पॉलिसीधारकांच्या पैशाला धोका निर्माण झाला आहे, असे ते म्हणाले.सार्वजनिक क्षेत्रातील कंपनीचा पैसा एका खासगी उद्योगपतीला वाचवण्यासाठी का वापरला गेला?, नीती आयोग आणि अर्थ मंत्रालयाने या प्रकरणात कोणती भूमिका बजावली?, पंतप्रधानांच्या लाडक्या मित्राला मदत करण्यासाठी अमेरिकन कोर्टात दोषी ठरवल्यानंतरही योजना का आखली गेली? या प्रश्नांची उत्तरे सरकारने दिली पाहिजे.आता हे स्पष्ट झालं आहे की, मोदी सरकार देशाच्या अर्थव्यवस्थेला काही मोजक्या उद्योगपतींच्या ताब्यात देत आहे. देशातील करदात्यांचा, पॉलिसीधारकांचा आणि सामान्य माणसाचा पैसा जर अशा उद्योगपतींच्या बचावासाठी वापरला जात असेल, तर ही केवळ आर्थिक नाही तर नैतिक दिवाळखोरीची देखील चिन्हं आहेत. केंद्र सरकारने तात्काळ या प्रकरणावर उत्तर द्यावं, ही देशातील जनतेची मागणी आहे, असे वडेट्टीवार म्हणालेत.

### सिडकोत मलिदा खाताना का थांबावेसे वाटले नाही?

## आता वय पुढे करून पळ काढू नका रोहित पवारांचा मंत्री शिरसाटांना टोला

दैनिक वादळ वार्ता
**पुणे (वृत्तसंस्था)**

राज्याचे मंत्री संजय शिरसाट यांनी नुकताच राजकीय निवृत्तीचा सूर लावल्यामुळे राजकीय वर्तुळात एकच चर्चा सुरू झाली आहे. शिरसाट यांच्या या वक्तव्याचा आमदार रोहित पवार यांनी खरपूस समाचार घेतला आहे. त्यांनी थेट सिडको जमीन घोटाळ्याचा संदर्भ देत शिरसाट यांना जबरदस्त टोला लगावला. सिडकोत मलिदा खाताना कुठेतरी थांबावे असा विचार का आला नाही? आता मंत्रिपदावरून गच्छंतीची वेळ येताच राजकीय निवृत्तीचे वेध लागले.



आता वय पुढे करून पळ काढू नका, असे रोहित पवार म्हणालेत.राज्याचे सामाजिक न्याय मंत्री आणि छत्रपती संभाजीनगरचे पालकमंत्री संजय शिरसाट यांनी मी १० वर्ष नगरसेवक होतो. आता चार टर्मचा आमदार आहे. झाले तेवढे पुरे, आता थांबले पाहिजे असे वक्तव्य करून आपल्या समर्थकांना ऐन दिवाळीतच धक्का दिला आहे. संजय शिरसाट यांनी या वक्तव्यामुळे राजकारणातून निवृत्तीचे संकेत दिले की, कुटुंबातील नव्या पिढीला पुढे आणण्यासाठीची ही भूमिका आहे, याबाबत राजकीय वर्तुळात चर्चांना उधाण आले आहे. आता यावरून रोहित पवारांनी ट्विट करून संजय शिरसाटांवर निशाणा साधला आहे.संजय शिरसाट, सिडकोत मलिदा खाताना कुठंतरी थांबावं असा विचार का आला नाही? आता मंत्रीपदावरून गच्छंतीची वेळ येताच राजकीय निवृत्तीचे वेध लागले. भूमिपुत्रांचा हक्क डावलून सिडकोची हजारो कोटी रुपयांची जमीन बिवलकर कुटुंबाच्या आणि खासगी बिल्डरांच्या घशात घालणारी आपल्यासारखी व्यक्ती जेवढे दिवस राजकारणात राहील तेवढे दिवस लोकांचे नुकसानच होणार आहे. पण आता वय पुढे करून पळ काढू नका. सरकारची ५-६ हजार कोटी रुपयांची जमीन खासगी लोकांच्या घशात घातल्याचा इंच इंच हिशोब तुम्हाला द्यावाच लागेल. आता सुट्टी नाही. असा इशारा रोहित पवारांनी त्यांच्या सोशल मीडिया पोस्टमधून दिला.राहिला प्रश्न माझ्याबाबत तुम्ही उपस्थित केलेल्या प्रश्नांचा, तर वेळ आणि ठिकाण तुम्ही सांगा. तुमच्या सगळ्या प्रश्नांची उत्तर मी समोरासमोर देतो माझ्या प्रश्नांची उत्तरे तुम्ही द्या, असे आव्हान आमदार रोहित पवार यांनी शिरसाट यांना दिले.

### रवींद्र धंगेकर अन्यायाविरोधात लढणारा कार्यकर्ता

## आपली भूमिका भाजपविरोधी नसल्याचे त्यांनी आधीच स्पष्ट केले-एकनाथ शिंदे

दैनिक वादळ वार्ता
**पुणे (वृत्तसंस्था)**

पुण्यातील जैन बोर्डिंग भूखंडाच्या व्यवहारावरून शिवसेना शिंदे गटाचे नेते रवींद्र धंगेकर आणि केंद्रीय राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ यांच्यात कलगीतुरा रंगला आहे. या प्रकरणावरून धंगेकर चांगलेच आक्रमक झाले असून, त्यांनी मुरलीधर मोहोळ यांच्यावर गंभीर आरोप केलेत. आता या वादात उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी मोठे विधान केले आहे. धंगेकर हे अन्यायाविरोधात लढणारे कार्यकर्ते असून, त्यांना महायुतीमध्ये दंगा करायचा नाही, असा सल्ला दिल्याचे एकनाथ शिंदे यांनी सांगितले.



उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आज आळंदी दौऱ्यावर आहेत. आळंदी विविध सुशोभिकरणाची कामे शिंदेंच्या हस्ते करण्यात आली. यावेळी त्यांना पत्रकारांनी जैन बोर्डिंग भूखंड व्यवहारावरून धंगेकर आणि मोहोळ यांच्या वादावर प्रतिक्रिया विचारली असता, त्यांनी उपरोक्त विधान केले. दरम्यान, आळंदी येथे रवींद्र धंगेकर यांनी एकनाथ शिंदे यांनी भेट घेतली. मी दोन दिवसांत तोडगा काढून देतो असे आश्वासन एकनाथ शिंदे यांनी मला दिल्याचे रवींद्र धंगेकर यांनी सांगितले.महायुतीमध्ये आपल्याला दंगा करायचा नाही, हे मी रवींद्र धंगेकर यांना सांगितले आहे. आता तो विषय संपला असल्याचे एकनाथ शिंदे म्हणाले. रवींद्र धंगेकरांना ज्या काही गोष्टींची माहिती मिळाली, त्याआधारावर ते बोललेत, असेही शिंदेनी म्हटले.आता मी त्यांना सांगितलंय की, महायुती आपली आहे. या वादातून आपल्याला विरोधकांच्या हातात कुठलही आयते कोलित द्यायचे नाही. रवींद्र धंगेकर हा काम करणारा आणि अन्यायाविरोधात लढणारा कार्यकर्ता आहे. माझी भूमिका भारतीय जनता पार्टी विरोधात नसल्याचे रवींद्र धंगेकर यांनी आधीच स्पष्ट केले आहे. आता जे काही प्रकरण सुरू होते, त्यावरही पडदा पडेल आणि हा विषय संपेल, असे एकनाथ शिंदे म्हणाले.

## पंढरपूरमध्ये कार्तिकी यात्रेला प्रारंभ, २४ तास दर्शनाची सुविधा!

दैनिक वादळ वार्ता
**पंढरपूर (वृत्तसंस्था)**

पंढरपूरमध्ये विठ्ठल-रुक्मिणी दर्शनासाठी येणाऱ्या भाविकांसाठी एक आनंदाची बातमी आहे. भक्तीच्या महासागरात दरवर्षी भाविकांनी भरून जाणाऱ्या पंढरपूर नगरीत यंदाच्या कार्तिकी यात्रेचा लवकरच प्रारंभ होत आहे. यात्रेच्या काळात वाढणारी भाविकांची गर्दी लक्षात घेऊन श्री विठ्ठल-रुक्मिणी मंदिर समितीकडून विशेष धार्मिक आणि प्रशासकीय व्यवस्था करण्यात आली आहे. विधिवत पूजा करून श्रींचा पलंग काढण्यात आला आहे, आणि आता भाविकांना २४ तास दर्शनाची सुविधा उपलब्ध उपलब्ध करून देण्यात आली आहे, अशी माहिती मंदिर समितीचे सहअध्यक्ष गहिनीनाथ महाराज औसेकर यांनी दिली.श्री विठ्ठल मूर्तीच्या पाठीशी लोड तर रुक्मिणी मातेच्या मूर्तीच्या पाठीशी तक्क्या ठेवण्यात आले आहे. या पारंपरिक विधीनंतर आता विठ्ठल-रुक्मिणीचे दर्शन अखंड सुरू राहणार आहे. यावेळी काकडा आरती, पोशाख, धुपारती, शेजारती या राजोपचारांना तात्पुरता विराम देण्यात आला असून, नित्यपूजा, महानैवेद्य आणि गंधाक्षता हे राजोपचार सुरू राहतील. भाविकांना हे अखंड दर्शन ९ नोव्हेंबर म्हणजेच प्रक्षाळपूजेपर्यंत पर्यंत मिळणार आहे. गर्दी नियंत्रणासाठी आणि दर्शनरांगा जलदगतीने पुढे सरकाव्यात यासाठी प्रशासनाने योग्य उपाययोजना केल्या आहेत. परंपरेनुसार पलंग काढल्यानंतर श्रींचे २४ तास मुखदर्शन व २२.१५ तास चरणदर्शन उपलब्ध असते. तसेच मंदिर समितीच्या संकेतस्थळावरून आणि विविध ठिकाणी लावलेल्या एलईडी पडद्यांद्वारे लाईव्ह दर्शनाची सुविधा भाविकांसाठी उपलब्ध करण्यात आली आहे.यात्रेच्या काळात सर्व व्हीआयपी दर्शन आणि खास पूजा बंद ठेवण्यात आल्या आहेत. श्रींच्या परंपरेनुसार सर्व धार्मिक विधी काटेकोरपणे पार पाडले जात असून, पलंग काढणे, एकादशी पूजन, महानैवेद्य, पादुकांची मिरवणूक, महाद्वार काला व प्रक्षाळपूजा या विधींचे नियोजन पूर्ण करण्यात आले आहे, अशी माहिती समितीकडून देण्यात आली आहे.मागील आषाढी यात्रेतील अनुभव लक्षात घेऊन यंदाच्या कार्तिकी यात्रेचे नियोजन अधिक सुयोग्यपणे करण्यात आले आहे. भाविकांना सुलभ, सुव्यवस्थित आणि जलद दर्शन मिळावे यासाठी मंदिर समिती, स्थानिक प्रशासन आणि पोलिस विभाग एकत्रितपणे प्रयत्नशील आहेत.



## विकासाच्या फसव्या फोटोंना जनता कंटाळली-आता रस्ते बनवणाऱ्यालाच मत

दैनिक वादळ वार्ता
**वैजापूर । अर्जुन शिंदे**

वैजापूर-लासुर रोडवरील खड्ड्यांनी नागरिकांचा विश्वास खालावला आहे. रस्त्यांवर अनेक खड्डे असल्यामुळे प्रवास धोकादायक झाला आहे. पावसाळा संपला तरी रस्ते तसचेच आहेत. यामुळे लासुर सर्कलमध्ये मतदारांचं लक्ष फक्त एका गोष्टीवर आहे फोटो नव्हे, काम करणारा उमेदवार हवा!गावोगाव उमेदवार पोस्टर, बॅनर आणि सोशल मीडियावर स्वतःचं ब्रँडिंग करत आहेत. पण नागरिक विचारतात जे आपल्या गावात एक रस्ता दुरुस्त करू शकले नाहीत, त्यांनी सर्कलचा विकास काय करणार? ग्रामस्थांचे मत ठाम आहे पाणीपुरवठा विस्कळीत आहे, शाळा बिकट आहेत, रस्ते खड्ड्यांनी भरलेले आहेत. काही ठिकाणी फक्त फोटो काढण्यासाठी रस्त्याच्या कडेला सिमेंट टाकून दाखवला जातो. एका नागरिकाने म्हटलं हा फोटो विकास नाही, फसवणूक आहे!

माजी सदस्य किंवा त्यांच्या घरातील लोक पुन्हा उमेदवारीसाठी सज्ज आहेत, पण जनता म्हणते ज्यांनी काहीही केलं नाही, त्यांना पुन्हा संधी नाही.एक तरुण मतदार म्हणतो स्वतःच्या अंगणात झाडू नाही, आणि हे आले सर्कल स्वच्छ करायला! आम्हाला आता वचनवीरांपेक्षा काम करणारे हवे.लासुर सर्कलमध्ये आता जनतेचा कल स्पष्ट आहे ज्याची सत्ता, त्याचाच विकास!

गेल्या काही वर्षांत विरोधी पक्षातील सदस्य निवडून आले, पण सत्तेत नसल्यामुळे मोठं काम होतं नाही, निधी मिळत नाही. त्यामुळे लोक ठरवतात की सत्ता असलेला उमेदवारच रस्ते, पाणी, शाळा आणि आरोग्य यांसारखी मूलभूत कामे करू शकतो.

एक मतदार म्हणतो आमदार-खासदार ज्या पक्षाचे आहेत, त्याच पक्षाचा सदस्य निवडून द्यायचा. नाहीतर फक्त भाषणं आणि आश्वासनं मिळतात लासुर सर्कलमध्ये यंदाची निवडणूक घोषणांवर नव्हे, तर प्रत्यक्ष कामावर ठरणार आहे. जनता सज्ज आहे जो काम करेल, त्यालाच मत!

## ब्रम्हपूरी तालुक्यात आ.विजय वडेट्टीवार यांच्या हस्ते विविध विकासकामांचे भूमिपूजन व लोकार्पण

दैनिक वादळ वार्ता
**चंद्रपूर । प्रतिनिधी**

सत्तेत असो वा विरोधी बाकावर, विकासकामात कुठलीही तडजोड न करता मतदारसंघाच्या विकासासंदर्भात सदैव कटिबध्द असणारे राज्याचे माजी विरोधी पक्षनेते, काँग्रेस विधीमंडळ पक्षनेते, आमदार विजय वडेट्टीवार यांनी विकासाचा झंझावात कायम राखत ब्रम्हपूरी तालुक्याच्या विकासासाठी शासनस्तरावर अथक प्रयत्न करीत कोट्यवधी रुपयांचा विकासनिधी खेचून आणला. याच विकास निधी अंतर्गत ब्रम्हपूरी तालुक्यातील विविध गावांमध्ये आज विकासकामांचा भुमीपुजन व लोकार्पण सोहळा पार पडला.आयोजित विकासकामात मालडोंगरी येथे मालडोंगरी येथील आरोग्य उपकेंद्राच्या संरक्षण भिंत बांधकामाचे भूमिपूजन (२० लक्ष रू.), चौगान येथे अभ्यासिका बांधकाम भुमीपुजन (४५ लक्ष रू.), खडीकरण रस्ता बांधकाम भुमीपुजन (१० लक्ष रू.), जुगनाळा अभ्यासिका बांधकाम भुमीपुजन (१५ लक्ष रू.), किन्ही येथे बौद्ध समाज मंदिर लोकार्पण (१५ लक्ष रू.), भोई समाज मंदिर बांधकाम भुमीपुजन(१५ लक्ष रु.), रणमोचन येथे समाज मंदिर बांधकाम भुमीपुजन (१५ लक्ष रू.), निलज येथे समाज मंदिर बांधकाम भुमीपुजन (१५ लक्ष रू.), रूई सिमेंट रस्ता बांधकाम भुमीपुजन (८ लक्ष रू.), तुलानमाल येथे मानका देवी समाज मंदिर लोकार्पण (१५ लक्ष रू.), गायडोंगरी येथे समाज मंदिर बांधकाम भुमीपुजन (१५ लक्ष रू.), रानबोथली येथे समाज मंदिर लोकार्पण (१५ लक्ष रू.), सावरदंड चक ते मुख्य रस्त्यापर्यंत खडीकरणाच्या बांधकामांचे भुमीपुजन (३० लक्ष रू.), चकबोथली येथे बौद्ध समाज मंदिर बांधकाम भुमीपुजन (१५ लक्ष रू.) या कामांचा समावेश आहे.

आयोजित भूमिपूजन व लोकार्पण सोहळ्या प्रसंगी नागरिकांशी संवाद साधतांना विधिमंडळ पक्षनेते तथा ब्रह्मपुरी विधानसभा क्षेत्र आ. विजय वडेट्टीवार म्हणाले की, लोकप्रतिनिधी या नात्याने आपण सर्वांनी जी सेवेची संधी दिली त्या संधीनेच जनसेवेसाठी तसेच क्षेत्राच्या सर्वांगीण विकासासाठी मी सदैव कटिबद्ध आहे. आपणशी जुळलेली नाळ व अतूट असे विश्वसनीय नाते या ऋणानुबंधाला मी कदापीही तडा जाऊ देणार नाही. असेही ते यावेळी म्हणाले.याप्रसंगी तालुका काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष खेमराज तिडके, बाजार समितीचे सभापती प्रभाकर सेलोकर, माजी जि.प.सदस्य डॉ राजेश कांबळे, माजी जि.प.सदस्य प्रमोद चिमुरकर, प्रदेश काँग्रेस सचिव डॉ.थानेश्वर कायरकर, जिल्हा काँग्रेस उपाध्यक्ष मोंटु पिलारे, सरपंच उमेश धोटे, कृउबा संचालक किशोर राऊत, अनुसूचित जाती सेलचे सरचिटणीस डि.के.मेश्राम, अण्णाजी ठाकरे, माजी संचालिका सुचित्रा ठाकरे, गणेश घोरमोडे, कृउबा संचालक दिवाकर मातेरे, देवचंद ठाकरे, सरपंच मंजुषा ठाकरे, उपसरपंच घोरमोडे, श्रीहरी देवगडे, चंद्रशेखर मेश्राम, पुंडलिक प्रधान, हेमंत ठाकरे, अशोक भुते, शंकर कोपुलवार, जगदीश नाकतोडे, प्रमोद भर्रे, विलास मेश्राम, संजय प्रधान, धीरुगोपाल धोंगडे, गोपाल ठाकरे, व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## ग्लोबल सायन्स इन्स्टिट्यूटच्या सांज पहाट कार्यक्रमात विविध क्षेत्रातील मान्यवरांचा सत्कार

दैनिक वादळ वार्ता
**सोलापूर । प्रतिनिधी**

दिवाळी निमित्त करमाळा शहरातील ज्ञानसेवा सोशल फाऊंडेशन संचलित ग्लोबल सायन्स इन्स्टिट्यूटचे संस्थापक प्रा. डॉ. महेश निकत यांच्यातर्फे आयोजित स्वरदीप सांज पाडवा या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. बुधवार दि.२२ रोजी सायं.७ ते रात्री उशिरापर्यंत चाललेल्या या कार्यक्रमात श्रोत्यांना संगीताच्या मेजवानीसह विविध क्षेत्रातील व्यक्ती व संस्था यांना मानपत्र, शाल व पुष्पगुच्छ देऊन सन्मानित करण्यात आले.शहरातील गणेश नगर येथील ग्लोबल सायन्स इन्स्टिट्यूटच्या नवीन इमारती समोरील प्रांगणात या कार्यक्रमाला सुरुवात झाली. दीप प्रज्वलना नंतर संदीप पाटील प्रस्तुत स्वरदीप सांज पाडवा या कार्यक्रमात सादर करण्यात आलेल्या भावगीते, भक्तिगीते, देशभक्तीपर गीते यांच्यासह बहारदार जुन्या-नव्या मराठी-हिंदी चित्रपटातील गीतांना श्रोत्यांनी भरभरून दाद दिली. या सोबतच करमाळा शहरातील डॉ. रविकिरण पवार, डॉ. लोकरे, डॉ.बिपिन परदेशी, डॉ.अमोल आणि सौ.स्वाती घाडगे, डॉ.विशाल शेटे, डॉ. विनोद गादीया, पंचायत समितीचे माजी उपसभापती पै. दत्ता सरडे आदींनीही या संगीत मैफिलीत आपली गायन कला तर प्रा.नागेश माने यांनी सुरेल बासरी वादन सादर केले.या कार्यक्रमा दरम्यान करमाळा शहर व तालुक्यातील सामाजिक, शैक्षणिक, साहित्यिक, वैद्यकीय, कृषी, क्रिडा, सांस्कृतिक, क्षेत्रातील योगदानाबद्दल श्रीराम प्रतिष्ठान संचलित अन्नपूर्णा योजना (करमाळा), मराठा फोर्ट्स : दुर्ग भ्रमंती व दुर्ग जागर (करमाळा) आणि श्री नागनाथ लेझिम मंडळ (शेटफळ, ता .करमाळा), डॉ. श्रीराम परदेशी, डॉ. विशाल शेटे, पत्रकार नासीर कबीर, सिद्धार्थ वाघमारे आणि विशाल परदेशी, युवराज मगर (सरपंच, उंदरगाव), सौ. परवीन खान (सरपंच, आवाटी), त्रिमूर्ती स्पोर्ट क्लब (करमाळा)चे सागर शिरसकर, वीर शिवाजी महाराज तलवार बाजी ग्रुप (करमाळा)चे प्रशिक्षक नागनाथ बोळगे, आंतरराष्ट्रीय महिला कुस्तीपटू आश्लेषा बागडे, जिल्हा परिषद प्राथमिक शाळा (उमरड), नामसाधना प्राथमिक विद्यामंदिर (मुलांची शाळा नं.१, करमाळा), साधनाबाई नामदेवराव जगताप प्राथमिक मुलींची शाळा नं.१, करमाळा), श्री छत्रपती शिवाजी विद्यालय (वीट, ता.करमाळा), त्रिमूर्ती विद्यालय व रामराजे कोकाटे जुनियर कॉलेज (टाकळी,ता.करमाळा), लोकमान्य टिळक गणेश उत्सव मंडळ (फंड गल्ली, करमाळा), छत्रपती शिवाजी महाराज तरुण मंडळ (सावंत गल्ली, करमाळा), गणेश कॉम्प्युटर (करमाळा), दिशा कॉम्प्युटर सेंटर (करमाळा), वर्ल्ड कॉम्प्युटर सेंटर (करमाळा), इनडिवाइस रिसर्चचे अध्यक्ष सत्यशोधन पाटील आणि हरिहर ग्रो (वीट)चे रणजीत निंबाळकर यांचा मानपत्र, शाल आणि पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला.या कार्यक्रमाला भाजपा जिल्हा सरचिटणीस गणेश चिवटे, आफसर जाधव, श्रेणीक खाटेर व सौ. संगीता खाटेर, प्रताप जगताप, कवी प्रकाश लावंड, डॉ. अजिंक्य पवार आणि शहरातील सर्व डॉक्टर्स, जेष्ठ पत्रकार अशपाक सय्यद, ग्राहक पंचायतच्या माधुरी काकी परदेशी यांच्यासह शहरातील अनेक नागरिक श्रोते उपस्थित होते.

# बोरद परिसरातील शेतकऱ्यांची मागणी पूर्ण करा!

## शासकीय कापूस खरेदी केंद्र तातडीने सुरू करण्याची जोरदार मागणी; शेतकऱ्यांची वेळ आणि पैशांची बचत होणार

**दैनिक वादळ वार्ता**
**नंदुरबार । दिपक गोसावी**

यावर्षी समाधानकारक पाऊस झाल्यामुळे बोरद परिसरात कापसाचे पीक मोठ्या प्रमाणात आले आहे. अनेक ठिकाणी कापूस काढणीलाही सुरुवात झाली आहे. मात्र, कापसाला योग्य हमीभाव मिळावा यासाठी भारतीय कापूस महामंडळ अंतर्गत बोरद येथील बंद असलेल्या जिनिंग मिलमध्ये तातडीने शासकीय कापूस खरेदी केंद्र सुरू करण्यात यावे, अशी जोरदार मागणी परिसरातील शेतकरी वर्गाने केली आहे. यावर्षी शासनाने कापसाला रु. ७,५०१/- पर्यंत हमीभाव जाहीर केला असला तरी, सध्या बाजारात खासगी व्यापारी मनमानी भाव लावून कापूस खरेदी करत आहेत. सुरुवातीला एका-दोन शेतकऱ्यांना हमीभाव देऊन नंतर कमी दरात खरेदी करण्याचे प्रकार वाढले आहेत. यामुळे शेतकऱ्यांचे मोठे आर्थिक नुकसान होत आहे.



बोरद परिसर २६ खेडी आणि १४ पाड्यांना जोडलेला असल्यामुळे या भागात मोठ्या प्रमाणात कापसाचे उत्पादन होते. सध्या शासकीय खरेदी सुरु नाही मात्र सुरु झाल्यावर खरेदीसाठी शेतकऱ्यांना ६० ते ७० किलोमीटर दूर असलेल्या नंदुरबार येथील केंद्रावर कापूस घेऊन जावे लागते, जे शेतकऱ्यांना परवडणारे नाही.

शेतकऱ्यांचे होणारे नुकसान थांबवण्यासाठी आणि त्यांची गैरसोय टाळण्यासाठी बोरद येथील बंद असलेल्या जिनिंग मिलमध्ये शासकीय कापूस खरेदी केंद्र सुरू करणे अत्यंत आवश्यक आहे. यामुळे शेतकऱ्यांच्या वाहतुकीचा वेळ आणि पैसा यांची मोठी बचत होऊन त्यांना कापसाचा योग्य हमीभाव मिळेल. त्यामुळे शासनाने शेतकऱ्यांच्या या मागणीचा गांभीर्याने विचार करून केंद्र तातडीने सुरू करावे, अशी अपेक्षा शेतकरी व्यक्त करत आहेत.

> “ जवळपास कुठलेही शासकीय केंद्र नसल्यामुळे आम्हाला नाईलाजास्तव व्यापारी देतील त्या कमी दरात कापसाची विक्री करावी लागते. जर बोरद येथे शासकीय कापूस खरेदी केंद्र सुरू झाले तर आमच्यासारख्या शेतकऱ्यांची सोय होईल त्याचबरोबर सगळ्यांचे हित देखील जोपासले जाईल. तसेच शेतकऱ्यांची आर्थिक बचत होईल व योग्य दर देखील मिळेल.
>
> शेतकरी संदीप लोटनगीर गोसावी
> (खरवड, ता. तळोदा)

> “ सध्या बोरद येथे ग्रामीण भागातील शेतकरी मोठ्या प्रमाणात कापूस विक्रीसाठी आणत आहेत. काही शेतकऱ्यांचा कापूस हा ओला असल्याने त्या ठिकाणी किरकोळ व्यापारी त्यांना ४५०० ते ५००० पर्यंत भाव देत आहेत.त्याचबरोबर जर कापूस कोरडा असेल तर एखाद दोन शेतकऱ्याला ६००० हजार ते ६५०० पर्यंत भाव मिळत आहे.

# ३३ वर्षांनंतर बीएससीच्या मित्रांचा तळोद्यात स्नेहमेळावा; गुरुजनांच्या भेटीने वातावरण भावूक

**दैनिक वादळ वार्ता**
**नंदुरबार । दिपक गोसावी**

तब्बल तेहतीस वर्षांनंतर तळोदा येथील महाविद्यालयात १९९० साली बी.एस.सी. उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांचा स्नेह मिलन मेळावा नुकताच चिरायू लॉज येथील बँक्वेट हॉल याठिकाणी उत्साहात पार पडला.या भावनिक आणि आनंददायी मेळाव्यात बोरिवली, वापी, नाशिक, लामकानी, अमरावती, शहादा, नवापूर, विरार अशा विविध भागांतून एकूण १२ विद्यार्थी सहभागी झाले होते. ३३ वर्षांच्या दीर्घ कालावधीनंतर हे सर्व मित्र पुन्हा एकत्र आल्याने आनंद द्विगुणित झाला होता.



मेळाव्याच्या सुरुवातीस प्रत्येकाने आपली व कुटुंबाची ओळख करून दिली. सर्व जण आयुष्यात स्थिरस्थावर असल्याबद्दल समाधान व्यक्त झाले. या यशामागे आई-वडिलांचे आणि गुरुजनांचे झालेले संस्कारच कामी आले, असा सूर यावेळी उपस्थित विद्यार्थ्यांनी व्यक्त केला. यावेळी प्रा.गणेश सोनवणे यांची कनिष्ठ महाविद्यालयीन शिक्षक संघटनेच्या जिल्हाध्यक्षपदी निवड झाल्याबद्दल त्यांचा सर्व मित्रांनी सत्कार करून पुढील वाटचालीस हार्दिक शुभेच्छा दिल्या.या स्नेहमेळाव्याची कायमस्वरूपी आठवण रहावी यासाठी परशुराम पाकळ यांनी सर्व सहभागी विद्यार्थ्यांना स्मृतीचिन्ह भेट दिली व हा ठेवा कायम जपून ठेवण्याचे आवाहन केले.कार्यक्रमाची सांगता अत्यंत भावूक वातावरणात झाली. विद्यार्थ्यांच्या बी.एस.सी.च्या काळात शिकवणाऱ्या प्रा.राजकुळे सरांची प्रकृती बरी नसल्यामुळे सर्व मित्रांनी त्यांच्या निवासस्थानी जाऊन त्यांची भेट घेतली. सरांनी प्रत्येकास नावाने हाक मारून विचारपूस केली. सरांनी नव्याने ‘ऑर्बिट’ची व्याख्या सांगून भेट दिल्याबद्दल समाधान व्यक्त केले. या भेटीने माझे आयुष्य वाढेल यात शंकाच नाही, असे वक्तव्य करत सरांनी संपूर्ण वातावरण भावूक केले. सरांनी सर्वांना शुभेच्छा व आशीर्वाद देऊन कार्यक्रमाची सांगता झाली.

# ट्रॅव्हल्सच्या धडकेने आरोग्य मदतनिसाचा जागीच मृत्यू: चालकाविरुद्ध गुन्हा दाखल

**दैनिक वादळ वार्ता**
**लातूर । नदीम पटेल**

दररोज पहाटे लातूरहून औशाकडे सायकलवरून महारुद्र ताडमाडगे येऊन पुन्हा परतणाऱ्या आरोग्य मदतनिसाचा रविवारी सकाळी बुधोडा येथे भरधाव वेगातील ट्रॅव्हल्सच्या धडकेत जागीच मृत्यू झाल्याची घटना घडली. याप्रकरणी मयताच्या मुलाच्या फिर्यादीवरून औसा पोलिसांत ट्रॅव्हल्स चालकाविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.महारुद्र त्र्यंबकप्पा ताडमाडगे (५०, रा. बामणी, ता.जि. लातूर, हमु, बौद्धनगर, लातूर) असे मयताचे नाव आहे. पोलिसांनी सांगितले, लातुरातील खाजगी दवाखान्यात आरोग्य मदतनीस म्हणून कार्यरत असलेले महारुद्र त्र्यंबकप्पा ताडमाडगे हे आपल्या मित्रांसोबत नियमितपणे सायकलिंग करीत असत. रविवारी सकाळी लातूरहून औशापर्यंत २० किमी सायकलिंग करून परतताना बुधोडाजवळील सर्व्हिस रोडवर पोहोचलहोते. तेव्हा औशाहून लातूरकडे जाणाऱ्या ट्रॅव्हल्स (एनएल ०१ बी २००४) च्या चालकाने निष्काळजीपणे ट्रॅव्हल्स चालवून सायकलस्वारास



धडक दिली. त्यात ते चाकाखाली चिरडल्याने जागीच मृत्यू झाला. अपघाताची माहिती मिळताच औसा पोलिसांनी घटनास्थळी धाव घेऊन घटनेचा पंचनामा केला. मयतमहारुद्र ताडमाडगे यांच्या मृतदेहाचे शवविच्छेदन येथील ग्रामीण रुग्णालयात करण्यात आले. औसा पोलिसांनी ट्रॅव्हल्स चालक मारुती बोयणे (रा. राणी अंकुलगा, ता. शिरूर अनंतपाळ) यास ताब्यात घेऊन गुन्हा दाखल केला आहे. अधिक तपास रामकृष्ण घुटे, मुब्बास शेख हे करीत आहेत.

# माधव तात्या निर्मळ यांचा भारतीय जनता पक्षात जाहीर प्रवेश

## केजच्या पदाधिकाऱ्यांनी केले स्वागत

**दैनिक वादळ वार्ता**
**केज । प्रतिनिधी**

माजलगाव विधानसभा मतदारसंघातील आदर्श उद्योजक व लोकप्रिय युवा नेते माधव तात्या निर्मळ यांनी दि.२६ ऑक्टोबर रोजी रविवारी भारतीय जनता पक्षात अधिकृत प्रवेश केला.परळी येथे झालेल्या भव्य स्नेहमिलन कार्यक्रमात पर्यावरण मंत्री तथा भाजपा नेत्या पंकजाताई मुंडे यांच्या हस्ते निर्मळ यांचा पक्षात औपचारिक प्रवेश झाला. या प्रसंगी भाजपा जिल्हाध्यक्ष शंकर भाऊ देशमुख,जिल्हा सचिव सुनील आबा गलांडे,जेष्ठ नेते रामकृष्ण (काका) घुले,जनार्धन गालफाडे, लोमटे काका,सुरज भैया घुले आदी मान्यवर उपस्थित होते.कार्यक्रम स्थळी उपस्थित कार्यकर्त्यांनी जोरदार घोषणाबाजी करत माधव तात्या निर्मळ यांच्या प्रवेशाचे स्वागत केले.



माधव तात्या निर्मळ यांनी आपल्या मनोगतात सांगितले की,मा.पंकजा ताई मुंडे यांच्या नेतृत्वावर आणि विकासाभिमुख कार्यशैलीवर माझा पूर्ण विश्वास आहे.समाजातील सर्व घटकांना बरोबर घेऊन विकासाचे कार्य पुढे नेण्यासाठी मी भाजपा मध्ये आलो आहे.जनतेचा विश्वास संपादन करून माजलगाव मतदार संघात भाजपा मजबूत करणे हेच माझे ध्येय आहे.यावेळी पंकजाताई मुंडे यांनीही त्यांच्या स्वागतपर भाषणात म्हटले की, माधव तात्या निर्मळ हे समाजसेवा आणि उद्योजकतेतून लोकांमध्ये लोकप्रिय झाले आहेत. अशा उद्यमशीलतरुणांच्या सहभागामुळे पक्ष अधिक बळकट होईल.या कार्यक्रमाला बीड,केज, अंबाजोगाई परळी,आष्टी, पाटोदा,माजलगाव, वडवणी,धारूर आणि आसपासच्या भागातील असंख्य भाजपाकार्यकर्ते, नागरिक आणि समर्थक मोठ्या संख्येने उपस्थित होते.कार्यक्रमाच्या शेवटी माधव तात्या निर्मळ यांना केजच्या कार्यकर्त्यांनी पुष्पहार घालून आणि जयघोष करत अभिनंदन केले.माधव तात्या निर्मळ यांच्या प्रवेशामुळे माजलगाव विधानसभा मतदारसंघात भाजपाला नवे बळ प्राप्त होणार असल्याचे राजकीय वर्तुळात सांगितले जात आहे.दरम्यान माधवतात्या निर्मळ यांच्या रूपाने नवीन ओबीसी चेहरा भाजपला मिळाला आहे.

# दुकानासमोर आरडाओरड केल्याचा राग तिघांकडून लाकडी दांड्या व पाईपने बेदम मारहाण,२१ वर्षीय तरुणाचा मृत्यू

## नंदुरबार जिल्ह्यातील मोलगी येथील थरार; आरोपींवर खुनाचा गुन्हा दाखल

**दैनिक वादळ वार्ता**
**रविंद्र वळवी । मोलगी**

दुकानासमोर जोरजोराने आरडाओरड करणाऱ्या एका २१ वर्षीय तरुणाला हाताबुक्यांनी व लोखंडी पाईप तसेच लाकडी दांड्याने बेदम मारहाण करण्यात आली. या हल्ल्यात गंभीर जखमी झालेल्या तरुणाचा उपचारादरम्यान मृत्यू झाला असून, मोलगी पोलिसांनी याप्रकरणी तिघा आरोपींविरुद्ध खुनाचा गुन्हा दाखल केला आहे.

ही संतापजनक घटना नंदुरबार जिल्ह्यातील मोलगी परिसरात दि. १७ ऑक्टोबर २०२५ रोजी सकाळी ९:३० वाजताच्या सुमारास घडली. पोलिसांकडून मिळालेल्या माहितीनुसार, मयत अनिल फोत्या पाडवी (वय २१, रा. कुवा, ता. अ.कुवा) हा दि. १७/१०/२०२५ रोजी सकाळी कुवा येथील रामसिंग पाच्या पाडवी यांच्या किराणा दुकानासमोर सार्वजनिक ठिकाणी उभा राहून आरडाओरड करत होता. याचा राग आल्याने आरोपी रामसिंग पाच्या पाडवी याने मयतास



हाताबुक्यांनी मानेवर, पोटावर आणि पाठीवर मारहाण केली.यानंतर आरोपी गेमा देवल्या पाडवी याने आपल्या हातातील लाकडी दांड्याने आणि आरोपी खेमसिंग दमण्या पाडवी याने लोखंडी पाईपने अनिलला पाठीवर व कमरेवर बेदम मारहाण केली.

मारहाणीमुळे अनिल गंभीर जखमी झाला. फिर्यादी दिनेश फोत्या पाडवी यांनी तसेच इतर नातेवाईकांनी अनिलला उपचारासाठी खापर येथील खाजगी दवाखान्यात दाखल केले. त्यानंतर पुढील उपचारांसाठी त्याला निम्स हॉस्पिटल, नंदुरबार येथे हलवण्यात आले. दि. २०/१०/२०२५ ते २३/१०/२०२५ पर्यंत त्याच्यावर उपचार करण्यात आले आणि त्याला डिस्चार्जही देण्यात आला.मात्र, मारहाणीतील गंभीर दुखापतीमुळे घरी परतल्यानंतर त्याला पुन्हा त्रास होऊ लागला आणि त्यातच त्याचा मृत्यू झाला.

या घटनेनंतर, दि. २५ ऑक्टोबर २०२५ रोजी रात्री ९:४४ वाजता दिनेश फोत्या पाडवी (वय २७) यांनी मोलगी पोलीस ठाण्यात फिर्याद दिली. पोलिसांनी या तक्रारीच्या आधारावर आरोपी रामसिंग पाच्या पाडवी, गेमा देवल्या पाडवी आणि खेमसिंग दमण्या पाडवी (सर्व रा. कुवा) यांच्याविरुद्ध भा.न्या.सं. च्या कलम १०३ (१) (खुनाच्या गुन्ह्यासंदर्भात) आणि ३(५) प्रमाणे सहाय्यक पोलीस उप निरीक्षक सागर गाडी लोहार यांनी खुनाचा गुन्हा दाखल केला असून सहाय्यक पोलीस निरीक्षक दिपक पावरा याप्रकरणी पुढील तपास करत आहेत.

# साबला येथे ऊसतोड कामगार मोफत आरोग्य तपासणी शिबिर संपन्न

**दैनिक वादळ वार्ता**
**केज । प्रतिनिधी**

तालुक्यातील मौजे साबला आरोग्य विभाग , जिल्हा परिषद , बीड . व ग्रामपंचायत कार्यालय, साबला यांच्या वतीने या मोफत आरोग्य तपासणी शिबीराचे आयोजन साबला येथील सरपंच सौ . जनाबाई नरहरी काकडे यांच्या वतीने करण्यात आले होते . साबला येथील नागरिक जास्त प्रमाणात ऊसतोडणी करण्यासाठी ऊसतोड कामगार म्हणुन काम करण्यासाठी ईतर बाहेरच्या राज्यात दुर दुर ठिकाणी जातात . म्हणुन त्यांच्या आरोग्याची तसेच गावातील ईतर नागरिकांच्या आरोग्याची काळजी म्हणुन मोफत ऊसतोड कामगार आरोग्य शिबिर घेण्यात आले होते . तसेच ईतर सर्व गावातील नागरिकांची आरोग्य तपासणी करून त्यांना तात्काळ औषध , उपचार करण्यात आला . त्यामध्ये बिपी , शुगर , कॅन्सर , HIV , हिमोग्लोबिन तसेच सर्व आजारांची तपासणी करण्यात आली . यावेळी साबला नगरितील नागरिकांनी उत्तम प्रतिसाद दिला .आरोग्य मोफत तपासणी शिबिरातील डॉ . उदय धाट - समुदाय आरोग्य अधिकारी ,
डॉ . निखील कवडे - समुदाय आरोग्य अधिकारी




, डॉ . तौफिक पटेल - समुदाय आरोग्य अधिकारी , श्री संतोष काटे - आरोग्य सहाय्यक , श्री नितिन गलांडे पाटील - आरोग्य सेवक . श्री रामचंद्र आंधळे - आरोग्य सेवक , सौ . शिवप्रभा कोरसाळे - आरोग्य सेविका , सौ . चंपावती सत्वधर - परिचर , श्री शेख सलीम - महाराष्ट्र राज्य एड्स नियंत्रन कक्ष ग्रामीण विकास यंत्रणा . वरील सर्व वैद्यकिय अधिकारी , कर्मचारी यांच्या उपस्थितीत साबला येथे ऊसतोड कामगार तसेच ईतर सर्व नागरिकांची तपासणी करून त्यांना तात्काळ औषध उपचार करण्यात आला .साबला येथील ऊसतोड कामगार मोफत आरोग्य तपासणी शिबिर यशस्वी करण्याचे समाजसेवक , आदर्श शिक्षक नरहरी काकडे तसेच ग्रामपंचायत सदस्य ज्ञानेश्वर पांचाळ , गुलाब मुळे , विश्वनाथ नाईकनवरे , गणेश कटारे , लक्ष्मण कटारे , लखन राऊत , रामराजे शिंदे , राहुल मुळे , सौरभ काकडे इत्यादींनी केले .यावेळी ऊसतोड कामगार यांना ऊसतोड कामगार या प्रमाण पत्राचे वाटप करण्यात आले .

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक अजय महादेव भांगे यांनी निर्मिती प्रिंटिंग प्रेस, टाकळी रोड , धोंडीपुरा , जोशी नर्सिंग होमच्या समोर बीड ता.जि. बीड ४३११२२ येथे छापून दैनिक वादळवार्ता कार्यालय, महात्मा फुले नगर केज, पाण्याच्या टाकीजवळ केज ता. केज जि. बीड ४३११२३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले.मो.न.९४२२६६००७७

This newspaper is printed by owner, printer,publisher,editor Ajay Mahadev Bhange at nirmiti printing press, takli road, dhondipura in front Joshi nursing Home,Beed,tq.Beed,Dist.Beed 431122, Maharashtra and published at Dainik Vadalvarta office Mahatma Phule Nagar, near water tank kaij tq.kaij dist.Beed 431123(Maharashtra) mo.no.9422660077